**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२


क्रमांक: नार्को को-ऑर्डीनेशन/२०२३( )/२०२३/ २६१४ दिनांक २७.०७.२०२३.

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित /कायम विना अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान,
विधी, शारीरिक शिक्षण व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे जिल्हा.**

विषय - **नार्को कोऑर्डीनेशन सेंटर (Narco Co-ordination Center-NCORD) यंत्रणेंतर्गत केंद्र शासनाकडून नेमण्यात आलेल्या जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डीनेशनबाबत..**

संदर्भ - १. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांचे पत्र क्र. पगक/कवि/३०२९/२०२३ दि. १६.६.२०२३.
२. मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे पत्र क्र. स्था.गु.शाखा पुणे ग्रा/४४९९/२०२३ दि.२१.६.२०२३.
३. मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे जा.क्र.पो.अ./नार्को को-ऑर्डीनेशन बैठक इतिवृत्त/३२५४/२०२३ पुणे दिनांक २४.५.२०२३.

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, शासनाच्या गृह विभागाच्या पत्रान्वये जिल्हयातील वाढत्या अंमली पदार्थांच्या वापरावर आळा घालण्यासाठी तसेच क्षेत्रीत स्तरावरील अंमली पदार्थाबाबतची समस्या प्रभावीपणे हाताळण्यासाठी जिल्हास्तरीय NCORD समित्या जिल्हयांमध्ये प्रभावीपणे कार्यान्वित करण्याच्या सूचना मा. केंद्रय गृहमंत्री यांनी दिनांक २५.३.२०२२ रोजी झालेल्या NCORD शिखर समितीच्या तिस-या बैठकीत दिलेल्या आहेत.

पुणे जिल्हयातील अंमली पदार्थांच्या वापरावर आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे नार्को कोऑर्डीनेशन सेंटर (Narco Co-Ordination-NCORD) अंतर्गत सुधारीत समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे दिनांक १९.५.२०२३ रोजी घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये दिलेल्या सूचनेनुसार अंमली पदार्थाबाबत जनतेमध्ये जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अंमली पदार्थांचे दुष्परिणामाबाबत विदयार्थ्यांना माहिती देणे आवश्यक आहे. त्यासाठी पुणे जिल्हयातील सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी **एक कार्यक्रम घेवून सदर कार्यक्रमामध्ये अंमली पदार्थाबाबत जनजागृती करावी. सदर कार्यक्रमासाठी आपल्या महाविद्यालयातील एक प्राध्यापक यांचेकडे समन्वयक म्हणून जबाबदारी देण्यात यावी. सदर समन्वयकांनी सदर कार्यक्रमासाठी डॉ. वर्षा डोईफोडे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, औंध, पुणे यांची वेळ डॉ. मिलिंद करंजकर (९७६८९२४१७९) यांचेकडून घेऊन त्यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात यावे.**

सदर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास ई-मेलद्वारे पाठविण्यात यावा.

( डॉ. किरणकुमार बोंदर )
सहसंचालक,उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत - मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना माहितीसाठी सविनय सादर.

२/- पुणे जिल्हा संपूर्ण महाविद्यालयांची यादी सोबत जोडलेली आहे.